# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 08 December 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०८ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त भारत मोहिमेला प्रारंभ
- विधानसभेच्या विशेष अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांची शपथग्रहण प्रक्रिया सुरू
- ईव्हीएमद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध दर्शवत महाविकास आघाडीच्या आमदारांचा शपथविधीवर बहिष्कार
- माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आणि

- १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेत आज भारत आणि बांग्लादेश संघात अंतिम सामना

****

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त भारत मोहिमेला कालपासून प्रारंभ झाला. हरयाणात पंचकुला इथं, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या उपस्थितीत या मोहिमेचं उद्घाटन झालं. देशभरात ३४७ जिल्ह्यात तर महाराष्ट्रात १७ जिल्ह्यात ही मोहीम राबवली जाणार आहे.

राज्यात वाशिम इथून काल या मोहीमेस सुरुवात करण्यात आली. केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या मोहिमेचं उद्घाटन झालं. या शंभर दिवसांच्या कालावधीत निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार क्षयरोगाचं उच्चाटन करण्यासाठी आरोग्य सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाअंतर्गत राज्यात ११ हजार ६१०, नि:क्षय मित्रांची नेमणूक करण्यात आली असून, क्षय रुग्ण तपासणी आणि उपचार पद्धतीमध्ये गती येणार आहे, अशी माहिती आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे उपसचिव कौस्तुभ गिरी यांनी दिली.

नांदेड जिल्ह्यात तुप्पा इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांच्या हस्ते या मोहिमेची सुरुवात झाली. जिल्ह्यात भोकर ग्रामीण रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात रुग्णांना क्षयरोग आणि उपचारांविषयी माहिती देऊन मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या शंभर दिवसीय मोहिमेत सर्वांनी सहकार्य करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाला कालपासून सुरुवात झाली. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी सर्वप्रथम चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशिष जयस्वाल या नवनिर्वाचित आमदारांना, तालिका अध्यक्ष म्हणून सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. इतर आमदारांच्या शपथग्रहणानंतर सभागृहाचं कालचं कामकाज तहकूब झालं. उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना आज शपथ देण्यात येईल.

दरम्यान, विधानसभा अध्यक्षांची निवड उद्या नऊ तारखेला होणार असून, यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची मुदत आज दुपारी बारा वाजेपर्यंत असल्याचं, कोळंबकर यांनी सांगितलं.

****

ईव्हीएमद्वारे मतदान प्रक्रियेला विरोध म्हणून विरोधी पक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांनी काल विधानसभा सदस्यत्वाच्या शपथविधीवर बहिष्कार टाकला. समाजवादी पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचे चार आमदार वगळता विरोधी पक्षांच्या आमदारांनी काल सदस्यत्वाची शपथ घेतली नाही.

दरम्यान, जनभावनेचा आदर करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी काल शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती, प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी दिली. ते विधानसभा परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. आमदार आदित्य ठाकरे यांनीही आपली याबाबतची भूमिका स्पष्ट करताना, लोकांच्या भावनेचा मान राखून आम्ही शपथ घेत नसल्याचं सांगितलं.

विधानसभेचे माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या भूमिकेवर टीका करतांना, आमदारकीची शपथ न घेऊन, स्वत:च्या निवडीसंदर्भात शंका उपस्थित करत आहात का, असा प्रश्न विरोधकांना विचारला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, याबाबत बोलतांना विरोधक रडीचा डाव खेळत असल्याची टीका केली. लोकसभेला ईव्हीएमवर मतदान होऊन महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या, तेव्हा ईव्हीएम चांगलं होतं. मात्र विधानसभेत महायुतीच्या बाजुने जनतेने कौल दिला, त्यामुळे ईव्हीएमला दोष देण्यात येत असल्याचं पवार म्हणाले.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या आमदारांना शपथ घेण्यासाठी आज शेवटचा दिवस आहे. आज संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल, अन्यथा उद्या सदनाच्या कामकाजात विरोधकांना भाग घेता येणार नाही, याकडेही पवार यांनी लक्ष वेधलं.

****

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिव देहावर काल अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात राजूर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिचड यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी आमदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार किरण लहामटे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यासह समाजाच्या

विविध क्षेत्रातल्या नागरिकांनी पिचड यांना श्रद्धांजली अर्पण करून अखेरचा निरोप दिला.

****

सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल भारतीय सैन्य दलाच्या धैर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. देशवासियांनी सशस्त्र सेना ध्वज दिन निधीत योगदान द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

दरम्यान, लातूर जिल्हा प्रशासनाने गेल्या वर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करत मराठवाड्यात प्रथम, तर राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. या कामगिरीबद्दल काल, सशस्त्र सेना ध्वजदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण मंडळाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त लेफ्टनंट कर्नल शरद प्रकाश पांढरे यांना गौरवण्यात आलं.

****

बालरंगभूमी परिषदेच्या पहिल्या बालरंगभूमी संमेलनाचं येत्या २० ते २२ डिसेंबर दरम्यान पुणे इथं आयोजन होणार आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांनी काल पुणे इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. बालकलाकारांची भव्य शोभायात्रा, विविध कलांचं, चित्ररथांचं प्रदर्शन, राज्यभरात गाजलेली बालनाट्यं, लोककलेचं सादरीकरण, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांच्या बालकलावंतांचे कार्यक्रम या संमेलनात होणार आहेत. समारोपाच्या कार्यक्रमात ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

****

राज्य शासनाच्या ६३व्या हौशी मराठी नाट्य स्पर्धेला कालपासून बीड इथं सुरुवात झाली. स्पर्धेच्या या प्राथमिक फेरीत एकूण ६ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत.

****

अनंत भालेराव प्रतिष्ठानचा `अनंत भालेराव स्मृती पुरस्कार` प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगर इथं होणार आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सायंकाळी साडे पाच वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात, निवृत्त पोलिस अधिकारी डॉ.मीरा चड्ढा बोरवणकर यांना या पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. यावेळी डॉ. बोरवणकर यांचं 'पोलीस, राज्यकर्ते आणि समाज-आव्हाने आणि उपाय' ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे.

****

**क्रिकेट**

ऑस्ट्रेलियात ॲडलेड इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात काल तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या डावात पाच बाद एकशे २८ धावा केल्या आहेत. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ काल पहिल्या डावात तीनशे ३७ धावांवर सर्वबाद झाला, भारताचा पहिला डाव १८० धावांत संपुष्टात आला होता, भारताची दुसऱ्या डावाची सुरुवातही निराशाजनक झाली. यशस्वी जैस्वाल २४, शुभमन गिल २८, विराट कोहली ११, रोहित शर्मा सहा तर के एल राहुल सात धावांवर तंबूत परतले. ऋषभ पंत २८ तर निलेश रेड्डी ११ धावांवर खेळत आहेत. भारतीय संघ अद्याप २९ धावांनी पिछाडीवर आहे.

****

दुबई इथं सुरु असलेल्या १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेत आज भारत आणि बांग्लादेश यांच्यात अंतिम सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतानं उपांत्य सामन्यात श्रीलंकेला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

****

छत्रपती संभाजीनगर नजिक सातारा इथल्या खंडोबा मंदिरात काल चंपाषष्ठीचा सोहळा उत्साहात साजरा झाला. जय मल्हारच्या गजरात बेल भंडा-याची उधळण करत खांडोबाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

****

अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवास आजपासून प्रारंभ होत आहे. आज सकाळी दहा वाजता वर्णी देण्याचा कार्यक्रम होणार आहे. १५ डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या या नवरात्र महोत्सवामध्ये कीर्तन, गायन, भजन, वाघ्या- मुरळी आदी कार्यक्रम होणार असल्याची माहिती, योगेश्वरी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचे सचिव अशोक लोमटे यांनी दिली.

****

परभणी इथं विभागस्तरीय युवा महोत्सवाला युवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं. या महोत्सवात लोकनृत्य, लोकगीत, चित्रकला, वक्तृत्व, कौशल्य विकास, कविता वाचन, कथालेखन, तसंच विज्ञान आणि तंत्रज्ञानातल्या नव संकल्पना इत्यादी विविध प्रकारात स्पर्धा झाल्या, विजेत्यांना प्रमाणपत्र तसंच सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आलं. हे विजेते कलाकार येत्या १२ डिसेंबरला नांदेड इथं होणाऱ्या राज्य युवा महोत्सवात सहभागी होत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीने कालपासून आमचे शौचालय आमचा सन्मान या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयात पाण्याच्या नळाची सुयोग्य जोडणी, सुरळीत आणि सुरक्षित वीज पुरवठा, सुस्थितीत असलेले छत तसंच दरवाजे, स्वच्छता, रंगरंगोटी, या निकषांनुसार उत्कृष्ट शौचालयाची निवड होणार आहे. १० डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातल्या ग्रामपंचायती तसंच ग्रामस्थांनी सहभाग घेण्याचं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी केलं.

****

लातूर महानगरपालिकेची महिलांसाठी मोफत शहर बस सेवा पुढे चालूच राहणार असल्याचं, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी सांगितलं आहे. महापालिका प्रशासनाने महिलांना स्मार्ट कार्ड देण्यासाठी प्रत्येक प्रभागात केंद्र सुरू करावीत, अशा सूचना देशमुख यांनी आहे.

****